| MHAH200021282022 | **नियमित दिवाणी दावा क्र.४०३/२०२२**<br>श्रेया दौंड व इतर<br>वि.<br>बाळासाहेब दौंड व इतर |
|---|---|

**<u>निशाणी क्र.१८ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी करीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथनाप्रमाणे, वादी यांनी प्रस्तूतचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीचे वाटप तसेच मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. दिनांक २८/०३/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकत अ. नं. १ मधील ० हे. ४० आर. क्षेत्र बेकायदेशिरपणे खरेदी दस्त क्र. १०२८/२०२२ चे आधारे त्रयस्थ इसम नामे रामेश्वर किसन काकडे यांना खरेदी दिले. त्यानंतर रामेश्वर किसन काकडे यांनी त्यांचे नावावरील सदर मिळकत पोकळीस्त भरणा दाखवून भाउसाहेब सुगंध दौंड यांचे नावे करून दिले. त्याअनुषंगाने दुरुस्तीची करण्याची विनंती वादींनी प्रस्तुत अर्जाव्दारे केलेली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जाचे मंजुरीस हरकत घेतली व अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. प्रस्तूतचा दावा हा अचल संपत्तीबाबत असून दाव्यातील कथन सिध्द करण्याची जबाबदारी वादींवर आहे. प्रस्तूत अर्जातील नमूद कारण पहाता वादीतर्फे केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही, वादी यांची जी मागणी आहे ती मागणी कायम रहाते. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमूद कारण पाहता अर्ज मंजूरीस सबळ कारण दिसते. करीता आदेश.

**<u>आ दे श..</u>**

१. अर्ज निशाणी क्र.१८ चा अर्ज कॉस्ट रुपये २००/- वर मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी निशाणी क्र.१८ मध्ये नमूद विनंती केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती १४ दिवसांचे आत करावी व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी, अन्यथा आदेश रद्द समजण्यात येईल.

ASHWINI SUBHASH BIRAJDAR

Digitally signed by ASHWINI SUBHASH BIRAJDAR
Date: 2023.08.24 17:31:52 +0530

दिनांक २४/०८/२०२३

( ए. एस्. बिराजदार )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पाथर्डी.